## संपादकीय

# अमेरिकेची परराष्ट्रनीती आणि इराण संघर्ष : एक धोकादायक वळण

जागतिक महासत्ता म्हणून अमेरिकेकडून अपेक्षित असते ती स्थिर, दूरदर्शी आणि जबाबदार परराष्ट्रनीती. मात्र इतिहास साक्षी आहे की काही प्रसंगी नेतृत्वातील व्यक्तिनिष्ठ निर्णय, अंतर्गत राजकीय दबाव आणि आंतरराष्ट्रीय समीकरणे यांचा संगम घडून येतो आणि त्यातून धोकादायक निर्णय जन्म घेतात. इराणवरील हल्ल्याचा निर्णय हा अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या कारकीर्दीतील असा एक टर्निंग पॉइंट मानला जाऊ शकतो, ज्याने केवळ त्यांच्या नेतृत्वावरच नव्हे तर अमेरिकेच्या जागतिक भूमिकेवरही प्रश्नचिन्ह निर्माण केले. या निर्णयामागील सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांचा प्रभाव. पश्चिम आशियातील राजकारणात इस्त्रायल-अमेरिका संबंध नेहमीच घट्ट राहिले आहेत. मात्र या वेळी इस्त्रायलने इराणविरोधातील आपली रणनीती पुढे रेटण्यासाठी अमेरिकेचा वापर केला, असे अनेक आंतरराष्ट्रीय अहवाल सुचवतात. इराणवर हल्ला करण्यासाठी नेतान्याहू यांनी सातत्याने दबाव टाकला आणि अखेर ट्रम्प प्रशासन त्या जाळ्यात अडकले. वास्तविक, ट्रम्प यांनी पूर्वी अनेकदा पश्चिम आशियातील नव्या युद्धांविरोधात भूमिका घेतली होती. त्यांनी आपल्या आधीच्या प्रशासनांवर टीका करताना अमेरिकेला 'अनावश्यक युद्धांपासून दूर ठेवण्याची' गरज अधोरेखित केली होती. मात्र सत्तेत आल्यानंतर त्यांची भूमिका पूर्णपणे बदलली. यामागे केवळ आंतरराष्ट्रीय दबाव नव्हता, तर देशांतर्गत राजकीय अडचणीही कारणीभूत होत्या. विविध चौकशा, न्यायालयीन निर्णय आणि आगामी निवडणुकांचा ताण यामुळे प्रशासनाला लक्ष विचलित करणाऱ्या घटनेची गरज होती, असा आरोपही केला जातो. इराणच्या अण्वस्त्र कार्यक्रमाचा मुद्दा हा या संघर्षाचा मुख्य आधार म्हणून मांडला गेला. परंतु आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेसह अनेक जागतिक संस्थांनी इराण अणुबॉम्ब तयार करत असल्याचे ठोस पुरावे नसल्याचे स्पष्ट केले होते. तरीदेखील 'इराणी अणु धोका' हा राजकीय मुद्दा म्हणून सातत्याने पुढे आणण्यात आला. भीतीचे वातावरण निर्माण करून युद्धाचे समर्थन मिळवणे ही राजकीय युक्ती नवीन नाही, आणि याच तंत्राचा वापर या प्रकरणात झाल्याचे दिसते. या युद्धातील सर्वात चिंताजनक बाब म्हणजे त्याची बदलती उद्दिष्टे. सुरुवातीला विशिष्ट लष्करी लक्ष्य साध्य करण्याचा दावा करण्यात आला; मात्र पुढे जाऊन इराणमधील राजवट बदलण्याचा हेतू स्पष्ट झाला. कोणत्याही युद्धासाठी स्पष्ट आणि मर्यादित उद्दिष्ट आवश्यक असते. उद्दिष्ट्य बदलत राहिल्यास ते युद्ध दीर्घकालीन अस्थिरतेत रूपांतरित होते आणि त्याचे परिणाम अनपेक्षित स्वरूपाचे असतात. आंतरराष्ट्रीय पातळीवरही अमेरिकेला अपेक्षित पाठिंबा मिळाला नाही. 'नाटो'मधील अनेक देशांनी या कारवाईपासून अंतर ठेवले. फ्रान्सने उघड विरोध दर्शवला, तर ब्रिटनने सावध भूमिका घेतली. यामुळे अमेरिकेच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. एकेकाळी जगाचे नेतृत्व करणाऱ्या राष्ट्राला आता एकाकीपणाचा सामना करावा लागत असल्याचे चित्र दिसू लागले. 'प्रतिकाराची भूमिका' स्वीकारत इराण संघर्ष अधिक चिघळवू शकतो, ही शक्यता दुर्लक्षित करण्यात आली. इराणवरील हल्ला हा अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणातील एक गंभीर चूक ठरू शकतो. याचे परिणाम केवळ त्या प्रदेशापुरते मर्यादित राहणार नाहीत, तर जागतिक स्थैर्यावरही त्याचा परिणाम होणार आहे. भविष्यात अशा निर्णयांपासून धडा घेत अधिक संयम, संवाद आणि वास्तववादी धोरणांचा अवलंब करणे हीच काळाची गरज आहे.

# महाराष्ट्राचा अर्थ (विकास) संकल्प



**हॅलो प्रभात**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकताच सादर केलेला सन २०२६-२७ या वर्षाचा अर्थसंकल्प हा ख-या अर्थाने महाराष्ट्राच्या विकासाचा संकल्प आहे. प्रगतीशील विकास, शाश्वत विकास, सर्वसमावेशक विकास आणि सुशासन या चार स्तंभांवर आधारित असलेला हा अर्थसंकल्प आहे. गेल्या वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे अडचणीत आलेल्या शेतक-यांना महायुती सरकारने दोन लाखांपयतचे कर्ज माफ करुन मोठा आधार दिला आहे.

३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पीक कर्ज थकित असणा-या शेतकयांचे दोन लाखांचे कर्ज माफ करण्याबरोबरच नियमित कर्जफेड करणा-या शेतकयांना ५० हजारांचे प्रोत्साहनपर अनुदान देण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतला आहे. याच या कर्जमाफीच्या आधारा बरोबरच शेती क्षेत्रात एआय तंत्रज्ञानाचा वापर करुन शेतीला गती देण्याची तरतूद या बजेट मध्ये केलेली आहे. मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना, मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना या सुरु राहणार असुन त्यासाठी आवश्यक निधीची तरतूद केलेली आहे. प्राकृतिक शेतीचा विकास करण्याचे काम सुरु असून नवीन ५ लाख हेक्टर क्षेत्र प्राकृतिक शेती खाली आणण्याचे नियोजन केलेले आहे. महावेध, महाडीबिटी या सारख्या डिजिटल प्लेटफफॉर्मचा वापर करून ग्रामीण महाराष्ट्राची अर्थव्यवस्था आणखी मजबूत करणारा हा अर्थसंकल्प आहे.

याचबरोबरीने शाश्वत शहर विकासाला चालना देण्याचा प्रयत्न देखील सरकारने या वर्षीच्या अर्थसंकल्पात केलेली आहे. शाश्वत शहरी विकासासाठी १० सक्षम शहर विकास प्राधिकरणे, ५० हून अधिक सुनियोजित शहरी समूह विकसित करण्याचे नियोजन केलेले आहे. अटल सेतूला जोडून २०० चौरस किलोमीटर क्षेत्रात नवीन ३ री मुंबई विकसित करण्याचे नियोजन केलेले आहे. मुंबई महानगरातील २० लाख झोपड्यांचा पुनर्विकास करण्यात येणार आहे. तसेच मुंबईत १० लाख नवीन परवडणारी घरे विकसित करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. शहरी भागातील पायाभूत सुविधांच्या विकास करण्यासाठी राज्यातील मेट्रो नेटवर्क १२०० किलोमीटर पर्यंत वाढवण्यात येणार आहे. मुंबई विमानतळ ते नवी मुंबई विमानतळ मेट्रो साठी २२८६२ कोटी रुपयांची तर वडाळा ते गेटवे ऑफ इंडिया मेट्रोसाठी २३४८७ कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. हा भूमिगत मेट्रो प्रकल्प मंजूर करण्यात आलेला आहे. पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यात खडकवासला- स्वारगेट- हडपसर आणि खराडी या मार्गाला मंजुरी देण्यात आलेली आहे. मेट्रो बरोबरच राज्यातील रस्त्यांचे जाळे विकसित करण्यात येत आहे यामध्ये ६००० किलोमीटर लांबीचे द्रुतगती मार्गांचे जाळे तयार करण्याची योजना आहे. पुणे ते शिरूर या ५३ किलोमीटरच्या उन्नत मार्गासाठी ७५१४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तर तळेगाव ते चाकण उन्नत मार्गासाठी ६४९९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. चाकण ते शिक्रापूर मार्गाच्या सहा पदरीकरणासाठी ५२३२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

शिरूर ते छत्रपती संभाजी नगर ग्रीनफिल्ड महामार्गाचे सहा पदरीकरण करण्यासाठी १९२ किलोमीटरच्या रोडसाठी १४८६ कोटी रुपये याची तरतूद करण्यात आलेली आहे. या तरतुदींमुळे शहरी भागातील प्रवास आणखी वेगवान होण्याबरोबरच शहरातील वाहतूक कोंडी दूर होणार आहे. राज्यातील १००० लोकसंख्येपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावांना कॉंक्रीट रस्त्याने जोडण्यासाठी आशियाई बॅंकेच्या मदतीने ४५०० कोटी रुपयांचा कार्यक्रम राबवण्यात येणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा अधिक मजबूत होणार आहेत.

महाराष्ट्रातील पाणीटंचाईवर शाश्वत उपाय करण्यासाठी नदीजोड प्रकल्पातून शाश्वत विकास साध्य करण्यात येणार आहे. त्यामध्ये वैनगंगा नळगंगा नदीजोड प्रकल्पासाठी ९४९६८ कोटी रुपयांची तर दमणगंगा वैतरणा गोदावरी नदीजोड प्रकल्पासाठी १३४९७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. नारपार गिरणा नदीजोड प्रकल्प ७४६५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील पूर निवारणासाठी जागतिक बॅंकेच्या मदतीने २२४० कोटी रुपयांचा प्रकल्प राबविण्यात येत आहे.

महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी पुरेशी तरतूद करण्यात आलेली आहे. राज्यात सध्या २७ लाख लखपती दीदी झालेल्या आहेत २०२६-२७ च्या अर्थसंकल्पामध्ये आणखी २५ लाख लखपती दीदी करण्या साठी तरतूद केलेली आहे. नवी मुंबईमध्ये सहा देशांची विद्यापीठ नव्याने सुरू होणार आहेत, सर्व विद्यापीठ याच वर्षी सुरु होतील. मुख्यमंत्री विज्ञानवारी या योजनेतून विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची ओढ निर्माण करण्यासाठी विद्यार्थ्यांना इस्त्रो आणि अमेरिकेतील नासा या जगप्रसिद्ध संस्थांना भेट देण्याची संधी मिळणार आहे. स्टार्टअप मध्ये महाराष्ट्र नंबर वन झालेला आहे आणि पुढील वर्षांमध्ये पाच वर्षांमध्ये १ लाख २५००० उद्योजक या योजनेतून घडवणार आहे. या बजेट मध्ये ५०००० स्टार्टअपला बळ देण्याची योजना केलेली आहे.

आरोग्य क्षेत्रामध्ये आशियाई विकास बॅंकेच्या मदतीतून ग्रामीण भागासाठी कर्करोग, मधुमेह, हृदयविकार यासारख्या आजारांचे निदान करण्यासाठी ४५०० कोटी रुपयांची योजना राबवण्यात येणार आहे. महात्मा फुले जन आरोग्य योजनेमध्ये आजारांची संख्या १३५६ वरून २३९९ करण्यात आलेली आहे. रुग्णालयांची संख्या १७९२ वरून ४५३७ करण्यात आलेली आहे.उद्योगधंद्यांच्या विकासासाठी गडचिरोली स्टील हब मध्ये २ लाख ६१ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार आहे. यामधून ७० हजाराच्या पेक्षा जास्त रोजगार निर्मिती होईल. या ठिकाणी भूसंरक्षणासाठी पाच कोटी वृक्ष लागवडीची योजना आहे. या प्रमाणे महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास करणारा हा अर्थसंकल्प असून तो ख-या अर्थाने महाराष्ट्राचा विकास संकल्प आहे.

**ले.विनायक आंबेकर**
प्रवक्ता,भाजपा महाराष्ट्र



# गॅस टंचाईमुळे वस्तीगृहांतील विद्यार्थ्यांची गैरसोय

## पुरवठा सुरळीत करण्याची मागणी

सांगली : हॅलो प्रभात

आखाती युद्धाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात निर्माण झालेल्या गॅस सिलिंडर टंचाईचा फटका शासकीय वस्तीगृहे, आश्रमशाळा आणि निवासी शाळांना बसत असून, या ठिकाणी विनाखंड गॅस पुरवठा करावा, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) च्या वतीने करण्यात आली आहे.

जिल्ह्यात गॅस टंचाईमुळे एजन्सींसमोर नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. केंद्र व राज्य शासनाकडून टंचाई नसल्याचे सांगितले जात असले, तरी प्रत्यक्षात सर्वसामान्यांना सिलिंडर मिळवण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळे पुरवठा साखळी संथ झाली असून, औद्योगिक गॅस पुरवठाही काही प्रमाणात थांबवण्यात आल्याचे चित्र आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत जिल्ह्यातील अनेक वस्तीगृहे, आश्रमशाळा आणि निवासी शाळांमध्ये शेकडो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यांच्या चहा, नाश्ता व भोजनाची जबाबदारी शासनावर असून, गॅस टंचाईमुळे मेस व्यवस्थेवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. या संदर्भात जगन्नाथ ठोकळे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी तसेच सहाय्यक आयुक्त (समाजकल्याण) यांना निवेदन दिले आहे. तातडीने उपाययोजना न केल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता असल्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

### प्राधान्याने गॅस पुरवठा करा

सध्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेचा काळ आहे. अशा वेळी त्यांच्या भोजन व्यवस्थेत कोणताही व्यत्यय येऊ नये, यासाठी प्रशासनाने या शैक्षणिक संस्थांना प्राधान्याने व विनाखंड गॅस पुरवठा करावा

• जगन्नाथ ठोकळे (प्रदेश सचिव)

# सामाजिक विकासात संस्थांचा महत्त्वाचा वाटा : उज्ज्वल निकम

मिरज : हॅलो प्रभात



सामाजिक विकासामध्ये सामाजिक संस्थांचा वाटा अत्यंत महत्त्वाचा असून, समाजहितासाठी कार्य करताना दोन्ही बाजूंचा विचार होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन खा. ॲड. उज्ज्वल निकम यांनी केले. जिजाऊ चॅरिटेबल संस्था, मिरज यांच्या वतीने राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त आयोजित पुरस्कार वितरण समारंभात ते बोलत होते.

यावेळी युवा विकास कल्याणकारी सेवाभावी संस्थेच्या सामाजिक व लोकहिताच्या कार्याची दखल घेत, संस्थेला यावर्षीचा 'राजमाता जिजाऊ सामाजिक पुरस्कार' प्रदान करण्यात आला. पुरस्कार देताना समाजोपयोगी कार्यासोबत त्याच्या परिणामांचाही विचार होणे गरजेचे असून, अशा संतुलित कार्यालाच पुरस्कार देणे अधिक सार्थ ठरते, असे निकम यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सभापती जितेश कदम होते. प्रमुख पाहुणे ज्येष्ठ संपादक वसंत भोसले यांनीही संस्थेच्या कार्याचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या.

यावेळी संस्थापक अध्यक्ष धनंजय भिसे, प्रा. भीमराव धुळूबुळू, नगरसेविका रोहिणी पाटील, डॉ. विनोद परमशेट्टी, डॉ. रियाज मुजावर, डॉ. राजेंद्र मेथे यांच्यासह अन्य मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संस्थापक अध्यक्ष युवराज शिंदे म्हणाले की, 'राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या नावाने मिळालेला हा पुरस्कार प्रेरणादायी व अभिमानास्पद आहे. हा सन्मान संस्थेतील सर्व पदाधिकारी, सदस्य, महिला समिती तसेच संस्थेच्या कार्यात हातभार लावणाऱ्या सर्व ज्ञात-अज्ञात सांगलीकरांना समर्पित आहे.' कार्यक्रमास सचिव रेखा पाटील, नीता शिंदे, श्रीकांत पाटील, राजकुमार पेडणेकर, जयंत निरगुडे, सुलोचना पवार, भारती पाटील, ललिता घाडगे, प्रकाश मालपाणी, जयवंत मोरे व संस्थेचे सर्व संचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'कामत्स लेगसी'तर्फे 'उगादी सद्या'निमित्त विशेष मेजवानी

मुंबई : हॅलो प्रभात



दक्षिण भारतीय नववर्षाचे औचित्य साधून 'विक्रम कामत हॉस्पिटॅलिटी लिमिटेड'चा मुख्य ब्रँड असलेल्या 'कामत्स लेगसी'तर्फे 'उगादी सद्या' या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. १७ ते २३ मार्च २०२६ या कालावधीत चालणाऱ्या या उत्सवात भारताच्या समृद्ध खाद्यसंस्कृतीचा वारसा, चव आणि एकत्र येण्याचा आनंद अनुभवता येईल. दर वर्षीप्रमाणे यंदाही 'कामत्स लेगसी' 'उगादी'चा सण मोठ्या उत्साहात साजरा करीत आहे. पोंगल, विशू आणि ओणम यांसारखे सण साजरे करणारा पहिला आणि एकमेव हॉस्पिटॅलिटी ब्रँड म्हणून ओळख असलेल्या 'कामत्स लेगसी'ने आपल्या 'उगादी सद्या'च्या माध्यमातून प्रादेशिक अस्सलता आणि जुन्या आठवणींना उजाळा दिला आहे.

# सॅमसंगची 'गुढीपाडवा स्पेशल' ऑफर जाहीर

मुंबई : हॅलो प्रभात

गुढीपाडव्याच्या निमित्ताने सॅमसंगने 'गुढीपाडवा स्पेशल' मोहिम जाहीर केली असून एआय-समर्थित होम अप्लायन्सेसवर आकर्षक सवलती देण्यात आल्या आहेत. ही ऑफर २२ मार्च २०२६ पर्यंत वैध आहे. या मोहिमेत रेफ्रिजरेटर, वॉशिंग मशीन, एअर कंडिशनर आणि मायक्रोवेव्हवर सुमारे २०,००० रुपयांपर्यंत कॅशबॅक देण्यात येत आहे. निवडक मॉडेल्सवर झिरो डाऊन पेमेंटसह सुलभ फायनान्स पर्यायही उपलब्ध आहेत. तसेच एअर कंडिशनरवर मोफत इंस्टॉलेशन व ५ वर्षांची वॉरंटी दिली जात आहे. ही ऑफर कंपनीच्या संकेतस्थळासह देशभरातील निवडक विक्री केंद्रांवर उपलब्ध आहे.

# फॅबइंडियाचे गुढीपाडवा विशेष कलेक्शन जाहीर

पुणे : हॅलो प्रभात



गुढीपाडव्याच्या पार्श्वभूमीवर फॅबइंडियाने विशेष कलेक्शनची घोषणा केली आहे. यामध्ये पारंपरिक आणि आधुनिक शैलीचा संगम असलेले पोशाख सादर करण्यात आले आहेत. महिलांसाठी हँड-ब्लॉक प्रिंट साड्या, सिल्क एम्ब्रॉयडरी कुर्ते, बनारसी व चिकनकारी दुपट्टे आहेत. तर पुरुषांसाठी कुर्ते, शर्ट आणि बंधगला जॅकेट्सचा समावेश आहे. हे कलेक्शन देशभरातील फॅबइंडिया स्टोअर्स तसेच ऑनलाइन उपलब्ध करण्यात आले आहे.

# 'इसुझू आय-केअर प्री-समर कॅम्प'ची घोषणा

कोल्हापूर : हॅलो प्रभात

इसुझू मोटर्सने डी-मॅक्स पिक-अप्स आणि एसयूव्ही वाहनांसाठी 'आय-केअर प्री-समर कॅम्प' ची घोषणा केली आहे. हा कॅम्प २३ ते २८ मार्च दरम्यान देशभरातील सर्व अधिकृत सेवा केंद्रांवर आयोजित करण्यात येणार आहे. या शिबिरात वाहनांची प्रतिबंधात्मक तपासणी तसेच विशेष ऑफर्स व सवलती उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. उन्हाळ्यापूर्वी वाहनांची देखभाल करून ग्राहकांना त्रासमुक्त ड्रायव्हिंग अनुभव देण्याचा या उपक्रमामागील उद्देश आहे.

# जियो पेमेंट्स बॅंकेकडून 'कॅश विथड्रॉल'ला सुरुवात

मुंबई : हॅलो प्रभात

जियो पेमेंट्स बॅंक लिमिटेडनी UPI-आधारित कॅश विथड्रॉल सेवा सुरू केल्याची घोषणा केली आहे. या सेवेमुळे ग्राहकांना आता बिझनेस कॉरस्पॉंडंट टचपॉइंट्सवर QR कोड स्कॅन करून रोख रक्कम काढता येणार आहे. म्हणजेच डेबिट कार्ड किंवा पारंपरिक ATM नसतानाही ग्राहकांना सहजपणे पैसे काढता येतील. बॅंकेनुसार, ही सेवा ग्रामीण भागातील ग्राहकांचा विचार करून सुरू करण्यात आली आहे, जिथे ATM उपलब्धता मर्यादित आहे.

# रिटेल क्षेत्रातील गुणवंतांचा ट्रेन रिटेल अवॉड्‌र्समध्ये सन्मान

मुंबई : हॅलो प्रभात



ट्रेन रिटेल अवॉर्ड्‌सच्या १४ व्या आवृत्तीत रिटेल क्षेत्रातील फ्रंटलाइन कर्मचाऱ्यांच्या जिद्द, समर्पण आणि उत्कृष्ट ग्राहक सेवेला गौरविण्यात आले. 'ट्रस्ट फॉर रिटेलर्स अँड रिटेल असोसिएट्स ऑफ इंडिया आयोजित या उपक्रमाद्वारे दररोज ग्राहकांचे स्वागत करून आणि स्टोअर्सचे कामकाज सुरळीतपणे पार पाडणाऱ्या रिटेल असोसिएट्सच्या प्रेरणादायी कार्यावर प्रकाश टाकण्यात येतो. याप्रसंगी हिंदुस्तान युनिलिव्हरचे नॉन-एक्झिक्युटिव्ह चेअरमन नितीन परांजपे यांनी मुख्य पाहुणे म्हणून उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. परांजपे म्हणाले, 'जेव्हा मी 'आय जस्ट डिड इट' या माहितीपुस्तिकेचे पहिले पान उघडले आणि ट्रेनच्या सीईओ अमीषा प्रभू यांनी लिहिलेली प्रस्तावना वाचली, तेव्हा त्यांनी एका अतिशय अचूक मुद्द्यावर शेवट केला होता 'अखेर, मानवीय शक्ती हीच रिटेल क्षेत्राची खरी ताकद आहे.

# सेंट्रल माइन प्लॅनिंग अँड डिझाइनचा आयपीओ २० मार्च रोजी होणार खुला

मुंबई : हॅलो प्रभात

सेंट्रल माइन प्लॅनिंग अँड डिझाइन इन्स्टिट्यूट लिमिटेडने आपल्या पहिल्या सार्वजनिक समभाग विक्रीसाठी रू.२ दर्शनी मूल्याच्या प्रति इक्विटी शेअरसाठी रू.१६३ ते रू.१७२ चा किंमतपट्टा निश्चित केला आहे.

कंपनीचा आयपीओ शुक्रवार, २० मार्च रोजी सबस्क्रिप्शनसाठी खुला होईल आणि मंगळवार, २४ मार्च २०२६ रोजी बंद होईल. अँकर गुंतवणूकदारांसाठी हा कालावधी १८ मार्च २०२६ असेल. गुंतवणूकदार किमान ८० शेअर्ससाठी आणि त्यानंतर ८० च्या पटीत बोली लावू शकतात.

आजच्या तारखेनुसार कंपनीचे ७१४,०००,००० इक्विटी शेअर्स आऊटस्टॅंडिंग आहेत. हा आयपीओ प्रवर्तक कोल इंडिया द्वारे १०७,१,००,००० इक्विटी शेअर्सच्या विक्रीची ऑफर आहे.

# 'सनई चौघडे'मालिकेतून चिन्मयी साळवीचे पुनरागमन


मुंबई : हॅलो प्रभात



अभिनेत्री चिन्मयी साळवी तब्बल पाच वर्षांनंतर 'सनई चौघडे' या मराठी मालिकेतून पुनरागमन करत असून 'शर्वरी परब' ही तिची नवी भूमिका प्रेक्षकांसमोर येणार आहे. शर्वरी ही बेधडक, स्पष्टवक्ती आणि कुटुंबासाठी झटणारी मुलगी असून ती आईच्या टिफिन व्यवसायात मदत करताना स्कूटीवरून डिलिव्हरी करते. या भूमिकेसाठी चिन्मयीने विशेषतः स्कूटी चालवायला शिकल्याचे तिने सांगितले. हिंदी मालिकेनंतर मराठी मालिकेत काम करण्याची संधी मिळाल्याचा आनंद व्यक्त करताना तिने ही भूमिका प्रेक्षकांच्या लक्षात राहील, असा विश्वास व्यक्त केला. 'सनई चौघडे' ही मालिका दररोज रात्री ८.३० वाजता झी मराठीवर प्रसारित होत आहे.

# चंदुकाका सराफकडून 'विवाह तस्मै' कलेक्शन सादर

सातारा : हॅलो प्रभात




पिढ्यानपिढ्या ग्राहकांचा विश्वास संपादन केलेल्या बारामतीतील नामांकित सुवर्णपेढी चंदुकाका सराफ यांनी यंदाच्या लग्नसराईच्या पार्श्वभूमीवर 'विवाह तस्मै' हे विशेष दागिन्यांचे कलेक्शन सादर केले आहे. आधुनिक वधूच्या सौंदर्याला साजेसे डिझाईन आणि भारतीय परंपरेचा वारसा जपणारे हे कलेक्शन ग्राहकांसाठी सर्व दालनांमध्ये उपलब्ध करण्यात आले आहे.

या कलेक्शनमध्ये पारंपारिक ते आधुनिक अशा विविध प्रकारच्या दागिन्यांचा समावेश असून, लग्नसोहळ्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व प्रकारच्या अलंकारांची विस्तृत श्रेणी ग्राहकांना पाहायला मिळत आहे. बदलत्या ट्रेंडनुसार डिझाईन केलेले हे दागिने वधूच्या व्यक्तिमत्त्वाला अधिक उठावदार बनवतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

दरम्यान, गुढीपाडवा या शुभमुहूर्ताच्या निमित्ताने ग्राहकांसाठी आकर्षक ऑफर्स जाहीर करण्यात आल्या आहेत. यामध्ये सोन्याच्या दागिन्यांच्या घडणावळीवर ६० टक्क्यांपर्यंत, तर हिऱ्यांच्या दागिन्यांच्या घडणावळीवर १०० टक्क्यांपर्यंत सूट देण्यात येत आहे.

या विशेष संधीचा लाभ घेण्यासाठी ग्राहकांनी आपल्या जवळच्या चंदुकाका सराफ स्टोअरला भेट द्यावी, असे आवाहन संस्थेचे चेअरमन किशोरकुमार शहा आणि संचालक सम्यक शहा यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी टोल-फ्री क्रमांक १८०० २६७ ८५५५ उपलब्ध आहे.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक
हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात**, कार्यालय, **स.न.१४/१५/२/३, फ्लॅट नं.२०, शिवपुष्प, ए पार्क, वडगाव बु., पुणे- ४११०४१. (महाराष्ट्र)** येथून प्रसिद्ध केले.
■ **पुणे कार्यालय :** १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३० ■ **पुणे संपर्क : ८५५१०५५११३**
■ **कोल्हापूर कार्यालय :** एस ९४६, GF-7, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२
■ **सांगली मुख्य कार्यालय :** कल्पकुंज विहार, एस.टी. स्टॅंड रोड, सांगली. ■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)
■ संपादक : संजीव शाळगावकर